**वादी तर्फे सा.क्र.१ चा अतिरिक्त सरतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**१३.** आता मला वकिलांमार्फत प्रतिवादी क्र.१ व २ यांना पाठवलेल्या नोटीसीची स्थळप्रत दाखवली, तिला **नि. क्र.१५६** देण्यात येतो. त्यातील मजकूर माझ्या वडिलांनी सांगितलेला आहे. आता मला ती नोटीस पाठवल्याच्या व मिळाल्याच्या पोस्टाच्या पावत्या दाखवल्या, त्यांना अनुक्रमे **नि. क्र.१५७ ते १६०** देण्यात येतात. आता मला त्या नोटीसीला प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्या वकिलांनी नोटीसीस दिलेल्या उत्तराची स्थळप्रत दाखवली, तिला **नि. क्र.१६१** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे उलट तपास – श्री. व्ही. ए. करवीरकर वकील.**

**१४.** मी दावा मिळकत गट क्र.५८७/५ चा ७/१२ उतारा पाहिला आहे. त्यावरती स्थळ देवस्थानाची नोंद आहे. त्यावरती कब्जेदार सदरी उषाताई हनुमंत परुळेकर आणि शकुंतला व्यंकटेश देशमुख यांच्या नावाची नोंद आहे. आमच्याकडे सदर मिळकत आम्हाला देवाची पूजा करण्यासाठी मिळाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र.९९९ ने कृष्णा महार, यशवंत महार आणि गोविंद महार यांच्या नावाची नोंद कमी करण्यात आली आहे.

**१५.** मी दावा जमिनीच्या पीक–पाहणी नोंदी पाहिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये १९८९–१९९० पासून पीक–पाहणी सदरी प्रतिवादी क्र.१ च्या नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, १९८९ पासून माझ्या वडिलांच्या नावाची सदर मिळकतीच्या पीक– पाहणीला नोंद झालेली नाही. मी माझ्या वडिलांचे नाव पीक–पाहणीला असल्याचा उतारा पुढील तारखेला सादर करु शकतो.

**१६.** मी पीक–पाहणीच्या नोंदीबाबत या दाव्या व्यतिरिक्त इतर कोणतेही अपिल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, १९८९–१९९० पासून सदर मिळकतीत प्रतिवादी क्र.१ आणि २ यांचा ताबा आहे. सदर मिळकतीत प्रतिवादी क्र.१ चे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने ते घर २० वर्षांपूर्वी बांधलेले आहे. प्रतिवादी क्र.१ त्याने बांधलेल्या घराचा फाळा भरत असून त्याचा वीजपुरवठा त्याच्या नावे झालेला आहे.

प्रश्न – सदर जमिनीतील पिके प्रतिवादी क्र.१ व २ घेतात ?

उत्तर – सन २००८ पासून ते पिक घेत आहेत.

**१७**. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सन २००८ नंतर त्या जमिनीमध्ये पाईपलाईन, विहिर व बोअरवेल करुन सुधारणा केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीतील पीक–पाहणी बाबतचे प्रकरण क्र.२/१९८९–१९९० नायब तहसिलदार आजरा यांच्याकडे चालले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रकरणात माझ्या वडिलांनी साक्ष दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये माझ्या वडिलांनी सदर मिळकतीला त्यांच्या नावाची पोकळ नोंद झाली असून प्रतिवादी क्र.१ व २ कडे जमिनीचा ताबा असल्याचे सांगितले होते.

**१८**. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रकरणामध्ये यशवंत रामा कांबळे याची साक्ष झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, झालेल्या जबाबा प्रमाणे दि.०४.०२.१९९१ रोजी निकाल होऊन प्रतिवादी क्र.१ च्या नावाची पीक–पाहणीला नोंद झाली होती. आम्ही त्या आदेशा विरोधात आजपर्यंत कोठेही अपिल केलेले नाही.

**१९**. मी वडिलांची स्वाक्षरी दाखवल्यास ओळखू शकतो. आता मला दाखवलेल्या दि.२५. ०१.१९९१ रोजीच्या जबाबा वरती माझ्या वडिलांची स्वाक्षरी नाही. साक्षीदाराला उलट तपासा दरम्यान सदर दस्त दाखवल्यामुळे त्याला ओळखीपुरता **नि. क्र.१६४** देण्यात येतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर जबाबा वरील स्वाक्षरी या दाव्यातील व वकिलपत्रातील स्वाक्षरी प्रमाणे माझ्या वडिलांची आहे.

**२०**. उषाताई परुळेकर यांनी प्रतिवादी क्र.१ च्या विरोधात या न्यायालयात ताबा मिळण्यासाठी दावा दाखल केलेला होता. तो दावा न्यायालयाने नामंजूर केला आहे. माझ्याकडे उषाताई कडून सदर मिळकत आमच्या घराण्यात आल्याबाबतचा ३२–ग प्रमाणपत्र किंवा खरेदीचा पुरावा नाही. माझ्याकडे सदर परुळेकर व कांबळे यांच्या दरम्यान कूळकायद्याचे प्रकरण चालल्याचा पुरावा नाही.

प्रश्न – परुळेकरांनी प्रतिवादी क्र.१ च्या ताब्याबाबत कधीही आक्षेप घेतला नाही ?

उत्तर – परुळेकरांचा जमिनीशी कोणताही संबंध नसल्यामुळे आक्षेप घेतलेला नाही.

**२१**. प्रश्न – तुमच्याकडे १९५६ पासून दावा मिळकतीचे मालक झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा आहे काय ?

उत्तर – आमच्याकडे सन १९४८ पासून मालक असल्याचा पुरावा आहे.

**२२**. हे म्हणणे खरे आहे की, पुर्वीपासून सदर मिळकतीच्या ७/१२ उता–याला आमचे मालक म्हणून नाव लागलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी नायब तहसिलदार आजरा यांचा निर्णय होण्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ कडून रक्कम स्विकारुन सदर मिळकतीचे करारपत्र करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर बाब माझ्या वडिलांनी त्यांच्या नायब तहसिलदारां समोरील जबाबात मान्य केली आहे. माझ्या वडिलांनी प्रतिवादी क्र.१ च्या विरोधात पीक–पाहणी उता–यात नाव लागल्याबाबत कोणतेही प्रकरण दाखल केलेले नाही.

**२३**. उषाताई परुळेकर व शकुंतला देशमुख यांनी प्रतिवादी क्र.१ कडून सदर मिळकतीचा ताबा मिळण्याबाबत कोणतेही प्रकरण दाखल केलेले नाही. या न्यायालयात प्रतिवादी क्र.१ आणि त्याच्या मुलांमध्ये वाटणी बाबत ७८/२००० चा दावा दाखल झाला होता. मला त्यामध्ये त्यांच्यात तडजोड हुकूमनामा झाल्याची माहिती नाही. मला त्यानंतर काही वर्षांनी सदर मिळकतीच्या पीक–पाहणी उता–यात प्रतिवादी क्र.१ ऐवजी आक्काताई सावंतचे नाव लागल्याची माहिती नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**२४**. मला प्रतिवादी क्र.२ चे नाव पीक–पाहणी उता–यात लागल्याची माहिती २००८ साली मिळाली होती. मी २००८ साली पेरणोली येथे राहत होतो. मी २००८ पूर्वी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा काढून पाहत नव्हतो. आम्ही १९८९ पासून सन २००८ पर्यंत दावा मिळकतीचे उतारे पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतींशी माझ्या वडिलांचा अथवा आमचा कोणताही संबंध नसून आमच्या नावांची पोकळ नोंद झाली आहे.

**२५**. प्रतिवादी क्र.१ हा पेरणोली गावातील प्रतिष्ठीत नागरीक आहे. आम्ही त्यांच्या विरोधात पोलिसांकडे आजपर्यंत कोणतीही तक्रार दिलेली नाही. मी प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकतीमध्ये बांधलेल्या घराची किंमत वकिलांना दावा दाखल करताना सांगितलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सदर मिळकतीचे मालक नसल्यामुळे आम्हाला प्रतिवादी क्र.१ व २ कडून तिचा ताबा मागण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना त्रास देण्यासाठी व पैसे उकळण्यासाठी हा खोटा दावा

दाखल केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.११ व १२ तर्फे उलट तपास – श्री. डी. डी. आजगेकर वकील.**

२६. उलट तपास नाकारला.

**इतर प्रतिवादीं तर्फे – एकतर्फा.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ११.०८.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA